# नात्याचा आदर

मोठे काका तणतणत आमच्या घरी आले, "डोकी गहाण टाकली का रे तुम्ही का गुडघ्यात मेंदू आहेत तुमचे? किती मोठमोठ्याने भांडताय तुम्ही?"

"तसं नाही काका, जरा वाद चालू होता आमच्यात, थोडे आवाज वाढले इतकेच."

"काय थोडे आवाज वाढले, आमच्या घरात ऐकू येत आहेत तुमचे आवाज, कशासाठी इतका वाद चालू आहे तुमचा?"

"ते, अतुल त्याचा जॉब बदलायचा म्हणतोय."

"का? सगळं चांगलं चालू असताना तुला का भिकेचे डोहाळे लागले रे?"

"जास्त चांगलं पॅकेज मिळतंय" अतुल हळू आवाजात बोलला.

"काय करायचे ते नीट विचार करून करा. उगाच हे ही नाही आणि ते ही नाही, असं व्हायचं."

काका आपला सल्ला देऊन परत आपल्या घरी गेले. आमची घरे शेजारी शेजारी होती. किचन जरी वेगळ्या असल्या तरी बाहेरून दिसायला घर एकच होतं. त्यामुळे एकाच्या घरी बोललेले शब्द दुसऱ्याच्या घरी ऐकू जात असत.

"आई काका इकडे येऊन काहीही बोलतात. आम्ही आमचे निर्णय घेऊ की, त्यांनी प्रत्येक गोष्टीची दखल घेतलीच पाहिजे असे नाही ना."

"असू दे, मोठे आहेत ते घरात."

"घरात मोठे तर आजी आजोबा आहेत, त्यांना सुद्धा हेच बोलणार, कोणी अथॉरिटी दिली काकांना प्रत्येक गोष्टीत बोलायची आणि ते पण गुडघ्यात मेंदू वगैरे काहीही बोलतात, मी ऐकून घेणार नाही ह्यापुढे."

"शांत रहा, मोठ्या माणसांना उलट काही बोलू नये, शिकवलं आहे ना मी तुला?"

"हो, तू हे ही शिकवलं आहेस की अन्याय सहन नाही करायचा. चूक ते चूकच असते. मग आता का मोठ्यांनी काहीही बोलावं आणि आम्ही ऐकून घ्यावं?

"हे बघ, मोठ्यांनी पण नीटच बोलायचे असते. रागाच्या भरात काका बोलले असतील, जाऊ दे, सोडून दे."

अतुल तणतणत त्याच्या खोलीत गेला. मी मनात विचार करू लागले, खरंच आहे, मुले मोठी झाली की त्यांना मित्रासारखे वागवावे म्हणतात. मोठ्यांनी जरी जास्त पावसाळे पाहिले असतील तरी काही बाबतीत मुलांना जास्त माहिती असते, अवेरनेस असतो, हे पण मान्य केले पाहिजे.

वयानी मोठी असलेली व्यक्ती दरवेळी बरोबरच असेल, असे नाही. त्या व्यक्तीने पण हे समजून घेतले पाहिजे आणि मुख्य म्हणजे, दुसऱ्याच्या घरात नाक खुपसण्याचा तर कोणाला अधिकारच नाही.

आपण बघतो, कितीतरी मोठे भाऊ आपल्या धाकट्या भावंडांना गावाहून आणून शिकवतात, नोकरीला लावतात, त्यांचे लग्न करून देतात, पण एकदा का त्या भावंडांचा संसार सुरू झाला की अलगद बाजूला होतात, त्यामुळे त्या घरात त्या मोठ्या भावाचा मान राहतो.

मोठ्यांनी आपला आब ठेऊन वागावे तरच लहान थोर त्यांना आदर देतील. ज्या कुटुंबात एकमेकांच्या बाबींमध्ये कुटुंबाबाहेरचे लोक दवळाढवळ करत नाहीत, तिथे एकमेकांमध्ये संबंध खूप चांगले राहतात. ~~असम~~ गरज पडली तर मदतीला जावे पण दुसऱ्याच्या कुटुंबात सल्ले न देणे, सर्वात उत्तम. कुठल्याही घरात काही सर्वगुणसंपन्न सगळेच असतात असे नाही, मग बाहेरच्या माणसाने येऊन आपल्याला सल्ले दिले तर आपल्याला आवडेल का, हा विचार प्रत्येकानी करावा.

जेव्हा मुलांना वडिलांच्या चपला पायात व्यवस्थित बसू लागतात, तेव्हा मुलांनाही, त्यांनी विचारला तरच सल्ला द्यावा. अन्यथा अपमान व्हायचा संभव असतो. त्यांना काहीच समजत नाही, असा आव आणून आपण शिकवू लागलो, तर ते तरुण मुलांना आवडत नाही.

शिवाय वापरायची भाषाही व्यवस्थित हवी. मुलांना मेंदू नाही, गुडघ्यात मेंदू असले वाक्प्रचार ~~तर~~ वापरूच नयेत. ~~अ~~ उद्या कदाचित तीच वाक्ये आपल्याला ऐकायला मिळतील. तुम्ही दुसऱ्याचा आदर ठेवा, दुसरे तुमचा आदर करतील.

आजकाल असे ही बघण्यात येते की, लग्न झालेल्या मुलींच्या आया, आपल्या मुलींना सतत मोबाईल वर कॉल करून त्यांच्या

संसारात ढवळाढवळ करत सल्ले देत राहतात. अतिशय चुकीचे आहे ते, एरवी लग्नाआधी त्या मुली आईला कुठलाच सल्ला विचारत नसतात, लग्न झाले की, सासरच्या घरातल्या प्रत्येक गोष्टीचे आख्यान आईला सांगत राहतात् आणि मुलीची आई पण मोठ्या हौसेने ते ऐकत मुलीला सल्ले देते. एखादे रोपटे एका ठिकाणाहून दुसरीकडे लावले तर ते सतत हलवत राहिलात तर ते रोपटे लावलेल्या जागी रुजु शकत नाही, तसेच आपल्या लग्न झालेल्या मुलीला कुटुंबात जुळवून घ्यायला वेळ तर द्यायला हवा. त्या मुलींना नवीन कुटुंबाशी जुळवून घेता आले नाही तर मग तिला सल्ला देऊ शकतो, आपण पाहिलेल्या अधिक पावसाळ्यांचे अनुभव सांगू शकतो.

कोणालाही सल्ला देताना, त्या सल्ल्याची गरज आहे का, हे आधी वडिलधाऱ्या मंडळींनी तपासून पाहिले पाहिजे. मी वयानी मोठा आहे म्हणजे प्रत्येक बाबतीत सल्ला देण्याचा अधिकार मला आहे, हा दुराग्रह बाजूला सारलात, तर आणि तरच आजची तरूण मंडळी तुमच्याशी आदरानी वागतील.

अंजली चौबळ
कोथरूड, पुणे
९८८१८९१४५२

